!! श्री !!

शिवसेना

खासदार चंद्रकांत खैरे

शिवसेना उपनेते

जा.क्र. : खा.का.प्र.प ३९०/१०/१०/१५

प्रति,मा.श्री.संपादक साहेब,कृपया प्रसिद्धीसाठी

# संभाजीनगर जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीचे अध्यक्षपद पुन्हा खासदार चंद्रकांत खैरे यांच्याकडे

**संभाजीनगर ( ता.१० ) :** संभाजीनगर जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीचे अध्यक्षपद मागील दोन पंचवार्षिक कालावधीत खासदार चंद्रकांत खैरे यांच्याकडे आहे. खासदार चंद्रकांत खैरे चार वेळा मतदार संघातुन निवडून आलेले असुन दोन पंचवार्षिक कालावधीपासुन संभाजीनगर जिल्ह्याचे अध्यक्षपद त्यांच्याकडे असुन या समितीमार्फत त्यांनी अनेक बैठका घेऊन जिल्ह्याचा प्रभावीपणे नियोजनबध्द विकास या कमिटीव्दारे केलेला आहे. खासदार चंद्रकांत खैरे यांनी या कमिटीच्या वेळोवेळी जिल्ह्यात तालुकास्तरावर विविध बैठका घेऊन जिल्ह्यातील ग्रामीण भागाचा नियोजन विकास व तेथील स्थानिक प्रश्न सोडविण्यासाठी सर्वांच्या मदतीने अनेक प्रश्न मार्गी लावावेत.

केंद्र सरकारच्या योजना कार्यान्वीत करणे, त्याचा आढावा घेणे, केंद्रीय ग्रामविकास मंत्रालयाच्या अखत्यारित येणारे योजनांना गतीमान करुन जिल्ह्याचा अधिकाधिक विकास कामांना व योजनांना प्राधान्य देऊन नागरिकांना सेवा सुविधा पुरविण्यासाठी केंद्र सरकार व राज्य सरकार यांचा जिल्हा नियोजन कमिटीव्दारे समन्वय साधणे व योजना कार्यान्वीत करणे हे मुख्य काम या कमिटीव्दारे खासदार चंद्रकांत खैरे यांनी वेळोवेळी केले.

मध्यतंरीच्या काळात केंद्रामध्ये सत्ताबद्दल होऊन मोदीचे सरकार स्थापन झाल्यानंतर जालन्याचे खासदार रावसाहेब दानवे यांच्याकडे केंद्रीय राज्यमंत्रीपद दिले होते. संभाजीनगर जिल्ह्यात पैठण, फुंलब्री, सिल्लोड आणि सोयगाव हे तालुके जालना जिल्ह्या मतदार संघात गेल्यामुळे व ते मंत्री असल्यामुळे संभाजीनगर जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीचे अध्यक्षपद केंद्रीय राज्यमंत्री म्हणुन त्यांच्याकडे देण्यात आले होते. परंतु दरम्यानच्या कालावधीत त्यांनी केंद्रीय राज्यमंत्री पदाचा राजीनामा दिला असल्यामुळे परत चेअरमन पद खासदार चंद्रकांत खैरे यांच्याकडे देण्यात आले तसेच सहअध्यक्ष म्हणुन जालन्याचे खासदार रावसाहेब दानवे यांच्या नियुक्ती संबंधिताचा सुधारित आदेश ही काढला आहे.

जिल्हा दक्षता सनियंत्रण समितीचे अध्यक्ष खासदार चंद्रकांत खैरे असुन, सहअध्यक्ष खासदार रावसाहेब दानवे, सदस्य सचिव जिल्हाधिकारी, सदस्य, जिल्हातील सर्व विधानसभा/विधान परिषद सदस्य, अध्यक्ष जिल्हा परिषद, महापौर असुन समनव्यक प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा हे आहेत.

संभाजीनगर जिल्ह्यात शिवसेनेच्या माध्यमातुन शिवसेनेचा खासदार म्हणुन खासदार चंद्रकांत खैरे यांनी अनेक केंद्रीय योजना आणल्या, चार वेळेस लोकसभेवर निवडुन आले, गेल्या दोन दशकापासुन संभाजीनगर जिल्हा दक्षता व सनियंत्रण समितीचे अनुभवी अध्यक्ष म्हणुन काम करत आहेत, केंद्र सरकारने याची दखल घेऊन त्वरीत या समितीचे अध्यक्ष म्हणुन खासदार चंद्रकांत खैरे यांची नियुक्ती केलेली असुन त्यासंबंधिचे केंद्र सरकारने पत्राव्दारे सुधारित आदेश पारित केलेले आहे. त्या अनुषंगाने यापुर्वी राहिलेले उर्वरित कामांचा आढावा घेण्यासाठी केंद्र शासनाच्या अनेक योजनांना अधिक गतीमान करण्यासाठी या समितीची लवकरच बैठक घेण्यात येणार आहे. असेही खासदार चंद्रकांत खैरे यांनी सांगितले.

कार्यालय : ''खैरे निवास'', वसंत भवन समोर, मच्छली खडक, संभाजीनगर-४३१ ००१. दुरध्वनी : ( ०२४० ) २३३११२५, २३३१२२५. फॅक्स : ( ०२४० ) २३४३०२५

cbkhaire@gmail.com , yp4329@gmail.com , ydp4329@gmail.com , procbkhaire@gmail.com ganeshwagh4400@gmail.com

8421415255/9420404329 8484066606/9604384400